**दिनांक : ०७ - ०९ - २०२६**

**विषय : नव्या पंच समिती अधिकाऱ्यांची नियुक्ती.**

सभासद बंधू भगिनींनो,

आज दिनांक ७/९/२६ रोजी संस्थे च्या नवीन निवडून आलेल्या ११ पंच समिती सदस्यांची पहिली मीटिंग संस्थे च्या मधुकर जोशी सभागृहात, निवडणूक अधिकारी ॲड. वैशाली देशपांडे यांच्या उपस्थितीत, घेण्यात आली.

ह्या मीटिंग मधे नव्या पंच समिती चे अध्यक्ष म्हणून श्री प्रदीप नेवाळकर, सचिव म्हणून श्री विनायक पटवर्धन आणि खजिनदार म्हणून श्रीमती अरुंधती भिडे यांची निवड एकमताने झाली. ह्या नंतर चे वैधानिक सोपस्कार पूर्ण झाल्यावर अँड. देशपांडे यांनी नवीन समिती तसेच पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. पंच समिती ची पूर्ण निवडणूक प्रक्रिया अत्यंत व्यवस्थित आणि शांत पणे पार पाडल्या बद्दल नव निर्वाचित अध्यक्षाने ॲड.

देशपांडे यांचे आभार मानले.

ह्या पुढे नव नवीन पंच समिती ची मीटिंग झाली यात खुल्या चर्चेत श्री नेवाळकर आणि श्री पटवर्धन यांनी सदस्यांना पंच समितीत आत्ता पर्यंत चालू असलेली कामा ची पद्धत, सध्या सोसायटी समोर असलेल्या कोर्ट केसेस तसेच सोसायटी च्या आर्थिक परिस्थिती बद्दल ची माहित समिती सदस्यांना दिली.

पुनर्निर्माण प्रकल्प बघता या पुढील समिती च्या सभा आपल्या समाज मंदिरात घेता येणार नाही तेंव्हा सभा कुठे घेऊ शकतो त्या बद्दल च्या प्रयत्नांची माहिती सचिवांनी सांगितली. सर्वांच्या मंजुरी ने अशी जागा नक्की करण्याचे ठरले. असे ही ठरविण्यात आले की पंच समिती च्या सभा निर्धारित दिवशी दुपारी ४.३० ला घेण्यात याव्या.

अध्यक्षांनी सर्व पंच समिती सदस्यांचे आभार मानून मीटिंग संपल्या चे जाहीर केले.

पंच समितीच्या वतीने